व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक व मानसिक ताण – विश्लेषणात्मक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विदयाशाखेअंतर्गत शिक्षणशास्त्र विद्यावाचस्पती पदवीच्या अंशतः पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक
ज्योती भारतराव दुधमल

मार्गदर्शक
डॉ. सोमनाथ किशनराव पचलिंग

शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर -२०२४

अनुक्रमणिका

अ.क्र.	मुद्यांचा तपशील	पृष्ठ क्र.
1.	प्रस्तावना	3
2.	संशोधनाची गरज	7
3.	संशोधनाचे महत्त्व	7
4.	समस्या विधान	8
5.	कार्यात्मक व्याख्या	8
6.	संशोधनाची उद्दिष्टे	11
7.	संशोधनाची गृहितके	12
8.	संशोधन परिकल्पना	13
9.	संशोधनाची व्याप्ती	14
10.	संशोधनाची मर्यादा	15
11.	परिमर्यादा	15
12.	संशोधनाची पद्धती	16
13.	जनसंख्या	16
14.	नमुना व नमुना निवड पद्धती	17
15.	संशोधनाची साधने	17
16.	संख्याशास्त्रीय परिमाणे	17
17.	संशोधनाची कार्यवाही	18
18.	संशोधनाचे वेळापत्रक	19
19.	संशोधनाचे अंदाजपत्रक	20
20.	संदर्भ ग्रंथ सूची	21

१. प्रस्तावना:

लहानापासून मोठयांपर्यंत ताण हा प्रत्येकात निर्माण होतो. उदाहरणार्थ- अभ्यासाबद्दल ताण निर्माण होतो. परीक्षाजवळ आली की, घरची सर्वच मंडळीचे एकच एक वाक्य ऐकून तणाव निर्माण होतो.

ताण – तणाव :

तणावाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येते.

“मनाची असंतुलित परिस्थिती म्हणजे तणाव होय.”

संदर्भ :फादर जोसेफ व पिठेकर एस.जे.

किंवा

“ताण म्हणजे मनाचा समतोल ढासळल्यावर एक सर्वसामान्य जाणीव.”

संदर्भ :पंडित संजय

नव्या परिस्थितीला तोंड देण्याकरिता वर्तनात बदल करण्याची तयारी करायला हवी.अशी तयारी नसेल तर मानसिक ताणामुळे स्नायुंवर ताण पडतो. तो कष्टदायक व तापदायक होतो. ताण - तणाव दर्शविणारी अनेक लक्षणे आहेत. त्यांचा शारीरिक, मानसिक व कार्यक्षमतेवर प्रभाव पडतो.

ताण - तणावाच्या मानसिक लक्षणात थकवा येणे, चिडचिड होणे, राग येणे, उदासिन राहणे अशी लक्षणे आढळतात. तणावांचा व्यक्तीच्या मानसिकतेवर परिणाम होतो.

बारावीनंतर वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये खाजगी शिकवणीमुळे ताण तणाव वाढू शकतो. जास्त अभ्यासाचा भार आणि स्पर्धेच्या युगात, विद्यार्थ्यांवर खूप जास्त दबाव असतो, ज्यामुळे मानसिक आरोग्यावर परिणाम होतो.

खाजगी शिकवणीमुळे येणारा मानसिक ताण:

- **अति अभ्यासाचा ताण:**

  खाजगी शिकवणीमुळे विद्यार्थ्यांना जास्त तास अभ्यास करावा लागतो, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक थकवा येतो.

- **स्पर्धेचा ताण:**

  परीक्षेमध्ये यश मिळवण्यासाठी प्रचंड स्पर्धा असते. त्यामुळे विद्यार्थ्यांवर चांगले गुण मिळवण्याचा आणि इतरांपेक्षा पुढे जाण्याचा दबाव असतो.

- **पालकांचा दबाव:**

  अनेक पालकांना वाटते की, त्यांच्या मुलांनी वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्रातच जावे, ज्यामुळे मुलांवर अधिक दबाव येतो.

- **वेळेचे बंधन:**

  खाजगी शिकवणी, शाळा आणि इतर ॲक्टिव्हिटीजमुळे विद्यार्थ्यांना स्वतःसाठी वेळ मिळत नाही, ज्यामुळे ताण वाढतो.

- **अपयशाची भीती:**

  परीक्षांमध्ये चांगले गुण न मिळाल्यास किंवा प्रवेश परीक्षेत यश न मिळाल्यास, विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य आणि भीतीची भावना येऊ शकते.

- **सामाजिक दबाव:**

  मित्र आणि नातेवाईकांकडून सतत तुलना केल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास कमी होऊ शकतो.

- **झोप न लागणे:**

  अति ताणामुळे झोप न येणे, भूक न लागणे अशा समस्या उदभवू शकतात.

आधुनिक शिक्षण प्रणालीतील स्पर्धात्मकता विद्यार्थ्यांवर शैक्षणिक व मानसिक ताण निर्माण करते. वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी खाजगी शिकवणी वर्गांची भूमिका महत्त्वाची ठरते, मात्र या शिकवणी वर्गांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर होणाऱ्या मानसिक ताणाचा परिणाम समजून घेणे आवश्यक आहे.

आजच्या स्पर्धात्मक शैक्षणिक क्षेत्रामध्ये, खाजगी कोचिंग क्लास हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा अविभाज्य भाग बनले आहेत, विशेषत: १२ वी नंतर वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी क्लासेसचा उद्देश शैक्षणिक कामगिरी वाढवणे आणि प्रवेश परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण देणे हे आहे. तथापि, अतिरिक्त अभ्यासक्रम, अभ्यासाचे दीर्घ तास आणि पालकाकडून केल्या जाणाऱ्या उच्च अपेक्षांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाची पातळी वाढते.

मानसिक दबाव या संदर्भात सामान्य घटना आहेत, जे केवळ शैक्षणिक परिणामांवरच नव्हेतर विद्यार्थ्यांच्या एकूण विकासावर देखील परिणाम करतात. उत्कृष्टतेची सततची शर्यत आणि अपयशाची भीती असे वातावरण तयार करते जे विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर, मानसिक अस्थिरतेवर आणि सामाजिक संवादांवर परिणाम करते.

हा अभ्यास विशेषत: १२ वी नंतर विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MH-CET खाजगी शिकवणी

क्लासेसमध्ये उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी अनुभवलेल्या शैक्षणिक व मानसिक ताणाचा शोध घेतो. ताणास कारणीभूत ठरणारे घटक, त्यांचे मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम समजून घेणे आणि अशा शैक्षणिक व मानसिक ताणाला कमी करण्यासाठी उपाय सुचवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. या समस्यांचे निराकरण करून, हे संशोधन शिक्षक, पालक आणि धोरणकर्ते यांना एक सहाय्यक आणि संतुलित शैक्षणिक वातावरण तयार करण्यासाठी अंतर्दृष्टी प्रदान करेल अशी संशोधकाला अपेक्षा आहे.

शैक्षणिक क्षेत्रात वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. डॉक्टर, अभियंता या व्यावसायिक क्षेत्रांत प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना अत्यंत कठीण आणि स्पर्धात्मक परीक्षांमधून जावे लागते. या परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी खाजगी शिकवणी वर्ग हा एक महत्त्वाचा पर्याय मानला जातो. परंतु या शिकवणी वर्गांमधील अध्ययनाची पद्धत, कालावधी, स्पर्धात्मकता आणि गुणवत्तेवरील लक्ष यामुळे विद्यार्थ्यांवर मोठ्या प्रमाणावर मानसिक ताण येतो.

विविध वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गामध्ये अभ्यासाचा दबाव, सततची तयारी, कडक वेळापत्रक आणि अपेक्षांचा बोजा यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडण्याचा धोका वाढतो. या ताणाचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर, आरोग्यावर आणि भविष्यातील करिअरवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो.

२. **संशोधनाची गरज:**

१. वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांवर होणाऱ्या शैक्षणिक व मानसिक ताणाचे प्रमाण सातत्याने वाढत असून, त्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे शैक्षणिक व मानसिक तणावाची कारणे जाणून घेणे आवश्यक आहे.

२. वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक व मानसिक ताणाचे प्रमाण कमी करण्यासाठी योग्य उपाय सुचविता येतील.

३. वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना तणावमुक्त शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

३. **संशोधनाचे महत्त्व:**

१. प्रस्तुत संशोधन हे वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने प्रभावी शैक्षणिक धोरणे तयार करण्यास मदत करेल.

२. त्याचबरोबर, सध्याच्या शिक्षणपद्धतीत आवश्यक त्या सुधारणा सुचवून, पालक, शिक्षक, खाजगी शिकवणी वर्ग आणि शैक्षणिक संस्था यांना

विद्यार्थ्यांना समजून घेण्यासाठी आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

३. वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व मानसिक ताणाची कारणे जाणून त्यांच्या मानसिक ताणाचे प्रमाण कमी करण्यासाठी योग्य उपाय सुचविण्यास मदत होईल.

४. समस्या विधान:

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक व मानसिक ताण – विश्लेषणात्मक अभ्यास

५. कार्यात्मक व्याख्या:

१. व्यावसायिक अभ्यासक्रम:

डॉक्टर व अभियंता या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या क्षेत्रांत प्रवेश मिळवण्याच्या अगोदर विद्यार्थ्यांना शिकाविला जाणारा अभ्यासक्रम असा याचा अर्थ आहे.

२. खाजगी शिकवणी:

डॉक्टर व अभियंता या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या क्षेत्रांत प्रवेश मिळविण्यासाठी NEET, JEE (Advanced) व MHT-CET या प्रवेश परीक्षेची तयारी करून घेणारे नांदेड शहरातील खाजगी शिकवणी वर्ग असा याचा अर्थ आहे.

३. विद्यार्थी:

डॉक्टर व अभियंता या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या क्षेत्रांत प्रवेश मिळविण्यासाठी NEET, JEE (Advanced) व MHT-CET या प्रवेश

परीक्षेची तयारी खाजगी शिकवणी लावून करणारे नांदेड शहरातील विद्यार्थी असा याचा अर्थ आहे.

४. **शैक्षणिक ताण:**

विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक ताण निर्माण करणारे अनेक घटक ओळखले गेले आहेत, ज्यात जास्त तास अभ्यास, इतर विद्यार्थ्यांशी स्पर्धा, परीक्षांमध्ये चांगली कामगिरी करण्याचा दबाव आणि अपयशाची भीती यांचा समावेश आहे.

ताण विद्यार्थ्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. याचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारे परिणाम होतो. थोड्या प्रमाणात ताण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि सकारात्मक असू शकतो, पण जास्त ताण विद्यार्थ्यांसाठी हानिकारक असतो.

थोडा ताण विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरित करू शकतो. थोडा ताण विद्यार्थ्यांची कार्यक्षमता वाढवू शकतो. सकारात्मक ताण स्मरणशक्ती वाढवण्यास मदत करतो.

मुख्य शैक्षणिक ताणामध्ये संवादाची भाषा, समवयस्कांची स्पर्धा, कामाचे लांब तास, वारंवार परीक्षा आणि वाढलेले अभ्यासाचे काम यांचा समावेश होतो.

संदर्भ : Manju C. Reena Alexander. Binod Divakaran, (April-2019).

५. मानसिक ताण:

विद्यार्थ्यांची मानसिक आरोग्य स्थिती, पालकांचा दबाव, सामाजिक तुलना वाढवणे, चिंता, नैराश्य, झोपेच्या तक्रारी, नकारात्मकतेचा प्रभाव, थकवा, चिडचिडेपणा यांसारखी लक्षणे मानसिक ताण म्हणून ओळखली जातात.

संदर्भ: Maji Sucarita, Shaturmohta Ansh, Deevels Diveesha, Sinha Samrudhi, (May-2024).

दबावाखाली राहणे आणि दुःखी होणे, पालकांच्या अपेक्षांबद्दल चिंता करणे, डोकेदुखी, चिंताग्रस्त होणे, खाण्याची इच्छा नसणे, कंटाळवाणेपणासह प्रेरणा, NEET, JEE (Advanced) व MHT-CET आकांक्षा सोडण्याची भावना, एकटे राहणे, चिडचिड होणे, असहाय्यतेची भावना यासारख्या परस्परसंबंधित लक्षणांचा समावेश मानसिक ताणात होतो.

संदर्भ: Pushpraj.B., Vidya. N., (Jun-2024).

६. विश्लेषणात्मक अभ्यास:

विश्लेषणात्मक अभ्यास म्हणजे एखाद्या समस्येचे किंवा घटनेचे बारकाईने आणि व्यवस्थित परीक्षण करून तिची मूलभूत कारणे, घटक आणि संबंधांचा अभ्यास करणे. यात माहितीचे संकलन, वर्गीकरण, आणि विश्लेषण यांचा समावेश असतो. याचा मुख्य उद्देश म्हणजे एखाद्या गोष्टीबद्दल सखोल माहिती मिळवणे आणि त्याआधारे निष्कर्ष काढणे किंवा उपाययोजना करणे. असा याचा अर्थ आहे.

६. **संशोधनाची उद्दिष्टे:**

१. नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक व मानसिक ताणाचे परीक्षण करणे.

२. नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक व मानसिक ताणाच्या विविध घटकांचा शोध घेणे.

३. नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक व मानसिक ताणाची कारणे जाणून घेणे.

४. नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक व मानसिक ताणाच्या परिणामांचा शोध घेणे.

५. नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक व मानसिक ताण कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.

७. संशोधनाची गृहितके:

१. कोचिंग न करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत कोचिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ताणतणावाचे प्रमाण लक्षणीयरीत्या जास्त आहे. संदर्भ: Shekhawat B.S., Meena Deepika, Yadav Sandhya, Dhaka Vikas, Vignesh k., (Novembar - 2023).

२. सामाजिक दबाव, पालकांच्या अपेक्षा आणि समवयस्कांच्या स्पर्धेमुळे येणारा ताण विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर आणि शैक्षणिक कामगिरीवर परिणाम करतो. संदर्भ: Thriveedhi Sreeram, Myla Achyuth, Vuppuluri Keerthana, Krishnsa Vijaya, (August-2023).

३. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर तसेच त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम करणारे अनेक ताण निर्माण करणारे घटक असतात. संदर्भ: Mishra Sanjiv, Yadav A.K., Khadka Prashant, (Dec.-2020)

४. कोटा या शहरामध्ये कोचिंग घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्यांचे अनेक अहवाल आले आहेत, विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर कोचिंगचा परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे .त्यामुळे NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांमधील ताणाला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांची सखोल माहिती घेण्याची गरज निर्माण झाली आहे.
संदर्भ: Shekhawat B.S., Meena Deepika, Yadav Sandhya, Dhaka Vikas, Vignesh k., (Novembar - 2023).

५. खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक ताण हा त्यांच्या मानसिक आरोग्यावर थेट परिणाम करतो. संदर्भ: Sarkar Druvika, (Oct-Dec.-2024).

६. वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांच्या मानसिक ताणाचा परिणाम म्हणून त्यांच्या शैक्षणिक कामगिरीत घट होते. संदर्भ: Mr. Rakulraj G.

७. वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील सराव परीक्षा, चाचण्या व स्पर्धात्मक वातावरण हे विद्यार्थ्यांच्या मानसिक ताणात भर घालतात. संदर्भ: Marimuthu Janakiram, P.Lavanya,Grace D. Lavanya, (March-2022).

८. पालक व शिक्षकांच्या जास्त अपेक्षा विद्यार्थ्यांवर मानसिक ताण निर्माण करतात. संदर्भ: Mishra Sanjiv, Yadav A.K., Khadka Prashant, (Dec.-2020).

८. संशोधन परिकल्पना:

नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांना येणारा मानसिक ताण त्यांच्या शैक्षणिक वाटचालीवर प्रतिकूल परिणाम करतो.

शून्य परिकल्पना :

नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना येणाऱ्या मानसिक ताणात सार्थ फरक दिसून येत नाही.

९. संशोधनाची व्याप्ती:

१) आशय व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांना येणाऱ्या मानसिक ताणापुरते व्यापक आहे.

२) क्षेत्र व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यापुरते व्यापक आहे.

३) घटक व्याप्ती :

वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET विद्यार्थ्यापुरते व्यापक आहे.

४) काल व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे कालावधी शैक्षणिक वर्ष २०२५ – २०२७ इतका व्यापक आहे.

१०. संशोधनाची मर्यादा:

१) आशय मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांना येणाऱ्या मानसिक ताणापुरते मर्यादित आहे.

२) क्षेत्र मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

३) घटक मर्यादा :

वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या NEET, JEE (Advanced) व MHT-CET विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

४) काल मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे कालावधी शैक्षणिक वर्ष २०२५ – २०२७ पुरते मर्यादित आहे.

११. परिमर्यादा:

१. सदर संशोधन केवळ १२ वी नंतर नांदेड शहरात राहून वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी NEET, JEE (Advanced) व MHT-CET या पूर्व परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

२. नांदेड शहराबाहेर राहून ग्रामीण भागात NEET, JEE (Advanced) व MHT-CET या पूर्व परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी यांचा या संशोधनात समावेश नाही.

३. प्रस्तुत संशोधनात केवळ मानसिक ताण यांचाच अभ्यास केला जाणार आहे. इतर ताण उदा. कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शारीरिक ताण याचा विचार करण्यात आलेला नाही.

४. सदर संशोधन केवळ वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी NEET, JEE (Advanced) व MHT-CET या पूर्व परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यापुरते मर्यादित आहे. या शिवाय इतर व्यावसायिक अभ्यासक्रम संशोधकाने विचारात घेतले नाहीत.

१२. संशोधनाची पद्धती:

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण संशोधन हि संशोधनाची पद्धती निवडली आहे. प्रस्तुत समस्या हि वर्तमानकालीन असल्याने यामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक व मानसिक ताण – विश्लेषणात्मक अभ्यास करायचा असल्याने संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पद्धती निवडली आहे.

१३.जनसंख्या:

वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थी जे शहरातील NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गात खाजगी शिकवणी घेतात हे सर्व विद्यार्थी ही या संशोधनाची जनसंख्या होय.

१४. नमुना व नमुना निवड पद्धती:

नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या नांदेड शहरातील NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील सर्व विद्यार्थी यामधून ५०० मुले व ५०० मुली असे एकूण १००० विद्यार्थी (NEET=४००, JEE=४००, MHT-CET =२००) न्यादर्श म्हणून निवडले जाणार आहेत. नमुना निवड ही सहेतुक नमुना निवड पद्धतीने केली जाणार आहे. नांदेड शहरात जवळपास NEET, JEE (Advanced) व MHT-CET खाजगी शिकवणी वर्गातील विद्यार्थी संख्या ही १०००० च्या आसपास असावी त्यामुळे एकूण जनसंख्या विचारात घेवून ५ % नमुना निवडण्याचे ठरविले आहे.

१५. संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधनात संशोधक संशोधनाची उदिष्टे विचारात घेवून मानसिक ताण शोधिका चाचणी हे साधन स्वत: शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तिंच्या मार्गदर्शनाखाली प्रमाणित चाचणी तयार करून वापरणार आहे.

१६. संख्याशास्त्रीय परिमाणे:

प्रस्तुत संशोधनात संकलित करण्यात आलेल्या संख्यात्मक माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, प्रमाण विचलन व t – test या संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर केला जाणार आहे.

१७. **संशोधनाची कार्यवाही:**

प्रस्तुत संशोधन समस्येवर संशोधन आराखडा तयार करण्यात आला. आराखड्यास मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष संशोधन कार्याची सुरुवात करण्यात येईल. प्रस्तुत संशोधानासंदर्भात खालील संशोधन झाल्याचे दिसून आले आहे.

१. Stress and coping strategy among coaching and non-coaching students in Kota: A comparative study.

कोचिंग उद्योग वेगाने वाढत आहे आणि विद्यार्थ्यांवर पुन्हा एकदा स्पर्धेचा भार वाढत आहे ही वस्तुस्थिती विद्यार्थ्यांसाठी वाढत्या कोचिंग उद्योगाचे सापेक्ष फायदे आणि जोखीम मोजण्याची गरज अधोरेखित करते. विद्यार्थ्यांच्या कल्याणाला चालना देण्यासाठी प्रभावी हस्तक्षेप डिझाइन करण्यासाठी शिक्षक, धोरणकर्ते आणि विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती देखील प्रदान करेल. म्हणून, हा अभ्यास कोचिंग आणि नॉन-कोचिंग विद्यार्थ्यांद्वारे वापरल्या जाणाऱ्या ताणतणावाचा आणि सामना करण्याच्या धोरणांचे मूल्यांकन आणि तुलना करण्यासाठी डिझाइन केला गेला होता.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्याचे ठरवले आहे. कारण प्रस्तुत संशोधन विषयाच्यादृष्टीने सर्वेक्षण संशोधन पद्धती अभ्यासासाठी संशोधकाला समर्पक वाटली.

संशोधकाने खालील प्रकरणामध्ये आपले संशोधन कार्य खालील प्रकरणानुसार करणार आहे.

२. Marimuthu Janakiram, P.Lavanya,Grace D. Lavanya, (March-2022)., *Prevalence of anxiety and depression among students appearing for NEET examination in a rural and ueban area of tamilnadu: across sectional analytical study.*

एक तृतीयांश पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना चिंता होती आणि अर्ध्याहून अधिक सहभागींना नैराश्य होते. विद्यार्थी नीट परीक्षेला बसताना शिक्षक, विद्यार्थी आणि सरकारने विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची स्थिती विचारात घेतली पाहिजे.

संशोधक खालील प्रकरणानुसार संशोधन कार्य करणार आहे.

प्रकरण १.प्रस्तावना

प्रकरण २. संबंधित साहित्याचा व पूर्व संशोधनाचा आढावा

प्रकरण ३.संशोधन कार्यपद्धती

प्रकरण ४. सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण ५. सारांश, निष्कर्ष व शिफारशी

१८. संशोधनाचे वेळापत्रक:

- संशोधन समस्या निवड — डिसेंबर - २०२४
- संशोधन आराखडा तयार करणे
- संबंधित साहित्यचा आढावा — जून -२०२५
- संशोधन साधन निर्मिती — डिसेंबर – २०२५
- माहिती संकलन करणे — जून – २०२६
- माहिती संकलन व विश्लेषण — डिसेंबर-२०२७
- निष्कर्ष व शिफारसी — जून- २०२८
- अहवाल लेखन करणे — डिसेंबर-२०२८
- सादरीकरण — डिसेंबर-२०२८

१९. संशोधनाचे अंदाजपत्रक:

१) संशोधन समस्या निश्चिती व प्राथमिक माहिती	१०००० रू
२) क्षेत्र भेटी	४५००० रू
३) माहिती संकलन- संगणक खरेदी	८५०००रू
४) संबधित साहित्याचा आढावा- साहित्य स्टेशनरी	२५००० रू
५) माहिती विश्लेषण- ग्रंथ खरेदी	२५००० रू
६) निष्कर्ष मांडणी	२५००० रू
७) अहवाल लेखन- टंकलेखन	४५००० रू
एकूण	२६०००० रू

२०. संदर्भ ग्रंथ सूची:

A. Chelackckoden Sanoob, Dr.Vidya N., Dr.Ramaa Raju, (January-2024). _Understanding Stressors, coping strategies, and the role of support systems in the psychological willbeing of adolescents in the context of the competitive exams: A comprehensive review._, EPRA International Journal of Multidisciplinary Researvh (IJMR) Peer Reviewed Journal. Valume:10, Issue:1.

B. K. Esha Gayatri, G. sridevi, S. Preetha, (Dec-2022)., _An Evaluation of stress induced by NEET coaching among school children._, Journal of Pharmaceutical Research International, Volume-33, Issue-59A.

C. Manju C. Reena Alexander. Binod Divakaran, (April-2019)., _Evaluation of stress parameters in new medical entrants based on their admission criteria to a south Indian medical college._, International Journal of Medical Research and Review, 1069/2312.

Marimuthu Janakiram, P.Lavanya,Grace D. Lavanya, (March-2022)., *Prevalence of anxiety and depression among students appearing for NEET examination in a rural and ueban area of tamilnadu: across sectional analytical study.,* International Journal of Community Medicine and Public Health, vol-9,No.3.

D. Prajapati Nidhi, *A Study of Stress Among Coaching Students In Relation To Their Academic Achievement And Psychogenic Variables With special reference to Kota Coaching Institutions*,. Vardhaman Mahaveer Open University, Kota.

मार्गदर्शक संशोधक

डॉ. सोमनाथ किशनराव पचलिंग
सहयोग सेवाभावी संस्था कॉलेज ऑफ
एज्युकेशन विष्णुपुरी, नांदेड

ज्योती भारतराव दुधमल